**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – सायमन आंतोन डिसोजा

वय सुमारे – ५५ वर्षे, व्यवसाय–सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक,

निवती पोलीस ठाणे, निवती, ता.वेंगुर्ला

**सरतपास सहायक सरकारी वकील श्रीमती व्ही.व्ही.ठाकूर यांच्या मार्फत सुरू**

०१. सन २०२४ मध्ये मी निवती पोलिस स्टेशन येथे कार्यरत होतो. गु. र. क्र. ०३/२०२४ हा भारतीय दंड संहिता कलम ३८०, ४५७ व ४५४ अन्वये दिनांक १२/०१/२०२४ रोजी दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास हा माझ्याकडे सोपविण्यात आला होता. सदर गुन्ह्यातील फिर्यादी भाग्यश्री राऊळ यांनी त्यांच्या राहत्या घराच्या स्टोअररुममधील दोन लाकडी कपाटे आरोपी याने चोरुन नेल्याबाबत फिर्याद दिली होती.

०२. तपासादरम्यान मी आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१ (अ)(१) प्रमाणे नोटीस दिली. (सा.दार आता दि. १२/०१/२०२४ रोजीची नोटीस दाखविण्यात आली) सदर नोटीसीवर माझी व आरोपीची सही असून, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर नोटीसीस **निशाणी पी५/पीडब्ल्यू ५** देणेत येते. त्यानंतर मी दि. १३/०१/२०२४ रोजी घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळ पंचनामा करतेवेळी फिर्यादी,तसेच पंच प्रकाश राणे व गणपत माधव हे हजर होते. त्यावेळी फिर्यादीने आम्हाला घटनास्थळ दाखविले होते. घटनास्थळ ग्रामपंचायत परुळे कुशेवाडा येथील घर नं. ५१६ हे आहे. सदरचे घर हे फिर्यादी यांच्या सासऱ्यांच्या मालकीचे आहे. (सा.दार आता दि. १३/०१/२०२४ रोजीचा **निशाणी पी१/पीडब्ल्यू१ कडील** घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला) सदर पंचनाम्यामधील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी व दोन पंचाची सही आहे. त्यानंतर मी आरोपीच्या घरी जाऊन जप्ती पंचनामा केला. जप्ती पंचनामा करतेवेळी फिर्यादी,आरोपी तसेच पंच प्रकाश राणे व गणपत माधव हे हजर होते. आरोपीने त्यावेळी चोरुन नेलेले एक काचेचे कपाट व दुसरे रिलिंग असलेले कपाट असे एकत्रीत दोन लाकडी कपाटे काढून अंगणात आणून ठेवली. त्यानंतर पंचासमक्ष मी तेथे

जप्ती पंचनामा केला. (सा.दार आता दि. १३/०१/२०२४ रोजीचा **निशाणी पी२/पीडब्ल्यू१ कडील जप्ती** पंचनामा दाखविण्यात आला) सदर पंचनाम्यामधील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी,आरोपीची व दोन पंचाची सही आहे. मी सदरचा जप्त मुद्देमाल पोलिस ठाणेमध्ये मुद्देमाल पावती अन्वये जमा केला. (सा.दार आता दि.१३/०१/२०२४ रोजीची मुद्देमाल पावती दाखविण्यात आली) सदर पावतीमधील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. सदर मुद्देमाल पावतीस **निशाणी पी६/पीडब्ल्यू ५** देण्यात येते. मी घटनास्थळी छायाचित्रे काढली. मी तपासादरमयाने फिर्यादीच्या राहत्या घराचे लाईटबिल व घरपत्रक उतारा प्राप्त करुन ते दोषारोपपत्रासोबत जोडले. लाईटबिल व घरपत्रक उतारा यास अनुक्रमे **निशाणी पी७/पीडब्ल्यू ५ व निशाणी पी८/पीडब्ल्यू ५** देण्यात येते. मी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती माझ्या असे निदर्शनास आले की, फिर्यादी यांच्या फिर्यादीनुसार कपाटांची चोरी झाली आहे. त्यामुळे मी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीस पाहिल्यास ओळखू शकतो तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पी.एम.सामंत यांचेमार्फत सुरू –**

०३. हे म्हणणे खरे आहे की,घटनास्थळापासुन १० फुट अंतरावरती मालवण ते वेंगुर्ला हा सागरी महामार्ग असून त्याच्यासमोर वेतोबा मंदिर आहे. हे म्हणणे खरे आहे की, वेतोबा मंदिराच्या बाजूस ३ ते ४ दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळापासुन १०० फुट अंतरावरती ग्रामपंचायत कुशेवाडा यांचे कार्यालय, तलाठी कार्यालय व रेशन दुकान देखील आहे. हे म्हणणे खरे आहे की,घटनास्थळाच्या आजुबाजूस १०० मीटर परिसरामध्ये १५ ते २० रहिवासी घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पंच प्रकाश राणे यांचे घर घटनास्थळापासुन ४ किलोमीटर इतक्या अंतरावरती आहे व पंच गणपत माधव यांचे घर घटनास्थळापासुन २ किलोमीटर इतक्या अंतरावरती आहे.

०४. हे म्हणणे खरे आहे की,घटनास्थळावरील घर हे दोन भागात विभागलेले असुन उत्तरेकडील भागात फिर्यादी राहतात व दक्षिणेकडील भागात पडवी आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे दक्षिणेकडील पडवीमध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की,फिर्यादीचे सासरे यशवंत

यांना फिर्यादी यांचे पती, आरोपी व इतर तीन मुली अशी अपत्ये आहेत. हे म्हणणे खरे आहे की,घर क्र. ५१६ हे यशवंत यांच्या नावावर आहे. यशवंत यांच्या वारसांमध्ये वाटणी झाली आहे किंवा कसे हे मला माहित नाही. घटनास्थळाच्या दक्षिणेकडील पडवीमध्ये आरोपी यांचा गणेशमूर्ती बनवायचा कारखाना होता किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की,घर क्र. ५१६ मध्ये दोन वेगवेगळे विद्युत कनेक्शन आहेत. हे म्हणणे खरे आहे की,जप्ती पंचनाम्यामध्ये घर नंबर नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की,जप्त कपाटे एक माणूस उचलू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की,जप्त कपाटांची लांबी रुंदी पाहता सदर कपाटे ही खिडकीची संपूर्ण जाळी काढल्याखेरीज बाहेर येणे अशक्य आहे. हे म्हणणे खरे नाही की,जप्ती पंचनामा करण्यात आला त्याठिकाणाहून राऊळवाडी कडे जायला पायवाट आहे.

०५. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील नमूद सर्व मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुतकामी खोटा तपास करुन खोटे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-

दिनांक- १३/०१/२०२६

(एस.जे.चिवटे)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.